• बीड (महाराष्ट्र) • वर्ष ३ रे • अंक ३२१ • गुरुवार,दि.२२ फेब्रुवारी २०२४ • RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रूपये
• Beed (Maharashtra) • Year 3 • Issue 321 • Thursday 22 Feb 2024 • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • Page1 • Pages 4 • Price 3





# दैनिक मराठवाडा पत्र

महाराष्ट्राचा बुलंद आवाज
|बीड | परभणी |छत्रपती संभाजीनगर |जालना |लातूर |धाराशिव |हिंगोली | नांदेड | नगर
■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

# लोकसभा निवडणुकीसाठी मराठवाड्यात मोर्चेबांधणी



मुंबई । वृत्तसेवा


**शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील ४८ लोकसभा मतदारसंघांपैकी १८ जिल्ह्यांमध्ये नुकतीच लोकसभा समन्वयकांची नियुक्ती केली. यात मराठवाड्यातील आठपैकी पाच लोकसभा मतदारसंघांचा समावेश आहे. भाजपला महाराष्ट्रातून हद्दपार करणे गरजेचे आहे असेही यावेळी ठाकरे म्हणाले. जनतेच्या न्यायालयात ठाकरे गटालाच पसंती असल्याचे पहायला मिळत आहे. लोकशाहीविरोधी भाजपचे काम महाराष्ट्राची जनता पाहतेय आणि नक्कीच भाजपला आणि त्यांच्यासोबत असलेल्या सत्तेतील गद्दारांना मातीत गाडल्याशिवाय स्वस्त बसणार नाही.**

शिवसेना
उद्धव बाळासाहेब ठाकरे

महाविकास आघाडीतील काँग्रेस , शरद पवारांची राष्ट्रवादी व वंचित आघाडी या घटक पक्षांमध्ये शिवसेना उद्धव ठाकरे हे मोठ्या भावाच्या भूमिकेत दिसणार आहेत, अशी चर्चा सुरू झाली आहे. मराठवाड्यातील आठपैकी पाच लोकसभा मतदारसंघांमध्ये ठाकरे गटाने समन्वयकांची नेमणूक केली असल्याने ठाकरे गट लोकसभेच्या पाच जागा मराठवाड्यातून लढवणार का? अशा चर्चांना उधाण आले आहे. आठपैकी ज्या पाच लोकसभा मतदारसंघांमध्ये ठाकरेंनी समन्वयक नेमले आहेत, त्यातील तीन मतदारसंघांत ठाकरेंचे विद्यमान खासदार आहेत, तर दोन मतदारसंघांपैकी जालन्यामध्ये ठाकरे गट पहिल्यांदाच लोकसभा निवडणूक लढवण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मराठवाड्यातील ज्या पाच लोकसभा मतदारसंघांमध्ये ठाकरे गटाने समन्वयक नेमले आहेत, त्यात परभणी, हिंगोली, धाराशिव या विद्यमान खासदार असलेल्या मतदारसंघांचा समावेश आहे. तर छत्रपती संभाजीनगर व जालना या दोन लोकसभा मतदारसंघांमध्ये समन्वयक नेमण्यात आले असून, या जागाही ठाकरे गटच लढवणार, असे बोलले जाते. धाराशिव,

**पुढील पानावर**

# बसस्थानकासमोरील चक्री जुगारावर कारवाई



बीड । प्रतिनिधी

शहरातील मुख्य वर्दळीचे ठिकाण असलेल्या बीड बसस्थानकासमोरील चक्री जुगार अड्ड्यावर बीड शहर पोलिसांनी छापा मारून १ लाख ९ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई आज दुपारी करण्यात आली बीड शहर पोलीस ठाण्याची जबाबदारी स्वीकारल्यापासून शीतलकुमार बल्लाळ यांनी अवैध धंद्याविरोधात कारवाईचा सपाटाच सुरु ठेवला आहे. आज हॉटेल बंजाराच्या बाजूला सुरु असलेल्या चक्री जुगार अड्ड्यावर पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ यांच्या सुचनेनुसार एपीआय श्री. सिरसाट, मनोज परजने, अशपाक सय्यद यांनी छापा मारून रमेश गवळीराम मातकर (रा चंपावती नगर) यास ताब्यात घेतले. या कारवाईत पोलिसांनी १ लाख ९ हजार ७४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



परळी : बारावीच्या परीक्षा सुरु झालेल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी मुधोळ यांनी परळी येथील परीक्षा केंद्राला भेट दिली.

# महायुती सरकारच्या काळात महाराष्ट्रात ड्रग्सचे साम्राज्य

पुणे । वृत्तसेवा

पुण्यात तीन दिवसात तब्बल ४ हजार कोटी रुपयांचे अंमली पदार्थ सापडणे अत्यंत गंभीर व चिंताजनक आहे. गुजरातमधील मुंद्रा बंदरातून हजारो टन ड्रग्जचा धंदा होत असल्याचे वारंवार उघड झाले आहे. मुंद्रा बंदराचा मालक व भाजपाचे काय संबंध आहेत, हे जगजाहीर आहे. महायुती सरकार राज्यातील तरुणांना धर्माची अफू व ड्रग्जचे विष देऊन बरबाद करण्याचे



काम करत आहे, अशी घणाघाती टीका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्षांनी केली. पत्रकारांशी बोलताना नाना पटोले म्हणाले की, राज्यात अंमलीपदार्थांचा काळा धंदा जोरात सुरु आहे. याआधी नाशिक, छत्रपती संभाजी नगर, अमरावती, सोलापूर या ठिकाणीही अंमली पदार्थांचे मोठे साठे सापडले होते. पोलिसांनी थातूर मातूर कारवाई केली, ड्रग माफिया मात्र मोकाटच राहिले म्हणूनच पुण्यात ४ हजार कोटी रुपयांचे ड्रग्ज सापडलेत. राज्यात कायदा सुव्यवस्थेचे तर धिंडवडेच निघाले आहेत. विधानसभेत राज्याचा एक वरिष्ठ मंत्रीच त्यांना धमक्या येत असल्याचे सांगतात यावरून कायदा सुव्यवस्थेची काय परिस्थिती आहे हे लक्षात येते. हे सरकार भ्रष्ट असून फक्त तिजोरी लुटण्यात व्यस्त आहे, या शब्दांत

**पुढील पानावर**

# पदाधिकाऱ्यांच्या जाचास कंटाळून ग्रामसेवकाची आत्महत्या

माजलगाव । प्रतिनिधी

बीडच्या माजलगाव पंचायत समितीचे लोणगाव येथील ग्रामसेवक रवींद्र सर्जेराव पवार (वय ३५) यांनी ग्रामपंचायतीच्या आजी-माजी पदाधिकारी यांच्या जाचास कंटाळून आज (दि.२१) जीवन संपवले. या घटनेमुळे खळबळ उडाली आहे. माजलगाव पंचायत समितीमध्ये ग्रामसेवकांची आयोजित केलेली मीटिंग संपल्यानंतर आज दुपारी ३ च्या सुमारास माजलगाव शहरालगत असलेल्या भाटवडगाव वसाहतीमध्ये राहत असलेल्या घरामध्ये पवार यांनी जीवन संपवले. इशशव छ्शुी दोन महिन्यांपूर्वी कोकण विभागातून माजलगाव पंचायत समितीला बदलून आलेले ग्रामसेवक रवींद्र सर्जेराव पवार (वय ३५) माजलगाव पंचायत समिती अंतर्गत असलेल्या लोणगाव येथे ग्रामसेवक म्हणून कार्यरत होते. तेथील बेकायदेशीर कामासाठी तेथील आजी-माजी पदाधिकारी ग्रामसेवक पवार यांच्यावर दबाव टाकत असल्याचा आरोप मृत ग्रामसेवकांच्या नातेवाईकांनी केला आहे. बेकायदेशीर कामे करण्यासाठी सततच्या दबाव धमक्यांना व्यतीत होऊन पवार यांनी टोकाचे पाऊल उचलल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. याबाबत अद्याप पोलिसांत गुन्हा दाखल झालेला नाही.

# रस्त्याच्या दुरुस्तीसाठी अनोखे आंदोलन

परभणी । वृत्तसेवा

कारेगाव रस्त्याच्या दुरुस्तीसाठी प्रशासनाने तत्काळ पावले उचलावीत, या प्रमुख मागणीसाठी एका युवकाने मंगळवारी दुपारी १ वाजता जलकुंभावर शोले स्टाईल आंदोलन सुरु केले. त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकारी घटनास्थळी जोपर्यंत दाखल होत नाहीत, तोपर्यंत खाली उतरणार नाही असा पवित्रा या युवकांनी घेतल्याने मोठी खळबळ उडाली. परभणी शहरातील देशमुख हॉटेल ते कारेगाव रस्त्याची मोठी दुरवस्था झाली आहे. या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहेत. या रस्त्याच्या कामासाठी वेगवेगळ्या पध्दतीने आंदोलन ही करण्यात आले. मात्र प्रशासनाने या रस्त्याच्या दुरुस्तीकडे कानाडोळा केला. परिणामी, विद्यार्थी, नागरिक व महिलांना ये-जा करताना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. त्याचबरोबर राहुल खटिंग यांनी या रस्त्याच्या कामाबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाला लेखी निवेदन दिले. मात्र तरीही या रस्त्याचे काम सुरू झालेले नाही. या रस्ता कामाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी राहुल खटिंग यांनी अचानक मंगळवारी दुपारी ममता कॉलनी परिसरातील जलकुभावर चढून शोले स्टाईल आंदोलन सुरू केले. त्यानंतर नवा मोंढा पोलीस, महानगरपालिकेचे अभियंता मिर्झा तनवीर बेग, अभियंता बालाजी सोनुले यांनी हे आंदोलन मागे घेण्यासाठी प्रयत्न केले. मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी उत्तर दिल्याशिवाय जलकुभावरून उतरणार नाही, असा पवित्रा राहुल खटिंग यांनी घेतला. त्यानंतर दुपारी अडीच वाजेच्या सुमारास सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी जलकुंभ परिसरात आले.

# बसवर दगडफेक



लातूर । वृत्तसेवा

निलंगा-किल्लारी प्रवासी वाहतूक करणाऱ्या निलंगा आगाराच्या बसवर दगडफेक करण्यात आल्याची घटना मंगळवारी घडली. तर कर्नाटकातील भालकी आगाराच्या बसवर ही दगडफेक करुन काचा फोडल्याची घटना घडली. पोलिसांनी सांगितले, निलंगा आगाराची (एम.एच. २० बी.एल. २५४४) ही बस निलंगा आगारातून किल्लारीकडे निघाली होती. दरम्यान, नणंद रोडवर दुपारी ४:३० वाजता अज्ञाताने बसवर दगडफेक करुन काच फोडली. याबाबत निलंगा पोलिस ठाण्यात बसचालक अनंत चव्हाण, वाहक भरत काळे यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला आहे. तर कर्नाटकातील भालकी आगाराची बस लातूरकडून भालकीकडे प्रवासी घेऊन निघाली होती. लातूर-बिदर महामार्गावर बसवेश्वर मंगल कार्यालय नजीक दुपारी २:३० वाजण्याच्या सुमारास अज्ञाताने या बसवर दगडफेक करून काच फोडली. याबाबत निलंगा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची रात्री प्रक्रिया सुरु आहे.




# अज्ञात वाहनाच्या धडकेत युवक ठार

बीड । प्रतिनिधी

दि.२१ वार बुधवार रोजी पहाटे मोकळ्या हवेत फिरायला जात असलेल्या ग्रामस्थांना अहमदपूर ते अहमदनगर राष्ट्रीय महामार्गावरील मांजरसुंभा ते पाटोदा दरम्यान लिंबागणेश येथील हॉटेल सांज गारवा समोर रस्त्याच्या कडेला गणेश एकनाथ भोसले वय २५ वर्षे रा.पिंपळवाडी ता.बीड मृतावस्थेत आढळून आला. डॉ.गणेश ढवळे यांनी नेकनुर पोलिस प्रशासनाला फोनवरून याची माहिती दिली.

# बारावीच्या परिक्षेत कॉप्यांचा सुळसुळाट

बीड । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील तेलगाव येथील सरस्वती विद्यालयातील परिक्षा केंद्रावर पहिल्याच पेपरला सर्रास कॉप्यांचा सुळसुळाट असल्याचे दिसले. शाळेच्या मागील बाजूने काही तरूण संरक्षण भिंतीवरून खिडक्यांवर जात होते. तेथून आतील विद्यार्थ्यांना कॉप्या देत असल्याचे कथीत व्हिडीओ देखील व्हायरल झाले आहेत. या प्रकाराने शाळेचा गलथान कारभार चव्हाट्यावर आला असून येथील केंद्र प्रमुखांच्या कामगिरीवर प्रश्न उपस्थित केला जात आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने २१ फेब्रुवारीपासून बारावीच्या परिक्षेला सुरूवात झाली आहे. जिल्ह्यातील १०२ केंद्रांवर ४१ हजार ५२ विद्यार्थी प्रविष्ट आहेत. परीक्षेच्या अनुषंगाने सर्व तयारी पूर्ण झाल्याचे प्रशासनाने मंगळवारी सांगितले होते. कॉपीमुक्त व भयमुक्त वातावरणात परीक्षा पार पाडण्यासाठी शिक्षण विभाग व जिल्हा प्रशासन सज्ज झाल्याचा दावा करण्यात आला होता. परंतू पहिल्याच पेपरला तेलगाव येथील सरस्वती शाळेतील परिक्षा केंद्रावर गैरप्रकार झाल्याचे समोर आले आहे. येथे पोलिस आणि केंद्र प्रमुखांच्या दुर्लक्षामुळे सर्रास बाहेरून कॉप्या पुरविल्या जात होत्या. या प्रकाराने जिल्ह्यातील प्रशासनाचा गलथान कारभार चव्हाट्यावर आला आहे. प्रत्येक परिक्षा केंद्रांवर केंद्रप्रमुख, बैठे पथक आणि बाहेरील सुरक्षेसाठी पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आलेला आहे. परंतू तेलगावच्या सरस्वती शाळेत हे सर्व नियोजन कोलमडल्याचे दिसले. येथील प्राचार्यांनीही सर्व काही सुरळीत होते, असा दावा केला आहे. तर बाहेरून कॉपी पुरविल्याच्या आरोपाचे खंडण करत पोलिसांचे काम कौतुकास्पद असल्याचे सांगितले. त्यामुळे शाळेच्या प्राचार्यांची भूमिकाच संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. आमच्याकडे सुरळीत परिक्षा सुरू आहे. कसलाही गैरप्रकार

**पुढील पानावर**

## संपादकीय

# सिगारेट धोकादायक



धूम्रपान करणे आरोग्यास अपायकारक आहे, हा वैधानिक इशारा सिगारेटच्या पाकिटावर वर्षानुवर्षे छापला जातोय. आपल्याकडे तर चित्रमय इशारा छापला जातो. सिगारेटच्या पाकिटाचा जवळजवळ ८५ टक्के भाग इशार्याचाच असतो. परंतु जानेवारी २०२४ च्याच आकडेवारीनुसार आपल्या देशात सुमारे साडेसात कोटी लोक धूम्रपान करतात. यात सुमारे ५८ लाख महिलांचाही समावेश आहे. जागतिक आरोग्य संघटनेने दिलेल्या आकडेवारीनुसार, देशातील २५ कोटींपेक्षा जास्त लोकांना तंबाखूजन्य पदार्थांचे व्यसन आहे. प्रश्न असा, की भयावह चित्रांनी पाकिटाचा बहुतांश भाग व्यापलेला असताना धूम्रपान करणार्यांना तो दिसत कसा नाही? त्याला कारण आहे तलङ्ग आणि एकदा ती जागी झाली, की समोर सिगारेटव्यतिरिक्त बहुधा काहीच दिसत नसावं. म्हणजेच, समस्या सौम्य करायची असेल तर ही तलङ्ग आटोक्यात आणावी लागेल. तसे प्रयत्न होतच नाहीत का? तेही मोठ्या प्रमाणावर होतात. पाकिटावरचे वैधानिक इशारे हा त्याचाच एक भाग आहे. मृत्यूला कोण घाबरत नाही? ती भीती दाखवली, की तलङ्ग नियंत्रित करण्याचा प्रयत्न होईल, अशी अपेक्षा असते. परंतु जिथं तीही पूर्ण होताना दिसत नाही, तिथं काहीतरी वेगळा मार्ग अवलंबण्याची गरज जाणवते. त्या दृष्टीनं नुकताच आलेला एक अहवाल अत्यंत महत्त्वाचा आहे. जी गोष्ट भीती दाखवून होत नाही, ती प्रोत्साहन देऊन करता येईल का, याचा विचार व्हायला हवा. मरणाची भीती जिथं काम करत नाही, तिथं जगण्याची आशा काम करू शकेल, असा विचार का करू नये? परंतु त्यासाठी 'एनईजेएम एव्हिडन्स'या जर्नलमध्ये प्रसिद्ध झालेल्या अहवालाची सकारात्मकतेनं दखल घ्यावी लागेल आणि त्यातील निष्कर्षांना ठळक प्रसिद्धी द्यावी लागेल. सिगारेटमुळे तब्येतीचं होणारं नुकसान सामान्यतः कायमस्वरूपी मानलं जातं. परंतु हा अहवाल असे सांगतो, की चाळिशीच्या आत सिगारेट सोडलीत, तर दहा वर्षांनी तुमचं शरीर पुन्हा एकदा इतकं सक्षम होईल, की तुम्ही अजिबात धूम्रपान न करणार्यांइतकं आयुष्य जगू शकाल. तरुणपणी लागलेलं धूम्रपानाचं व्यसन सोडणं नंतर अनेकांना शक्यच होत नाही. उलट कौटुंबिक जबाबदार्या आणि तणावांचं निमित्त पुढे करून व्यसनाच्या वाढत्या प्रमाणाचं समर्थनच केलं जातं. त्याउलट जर चाळिशीच्या आत धूम्रपान सोडण्याचा निर्णय घेतला आणि प्रामाणिकपणे अंमलात आणला, तर त्याचे सुपरिणाम पुढील तीनच वर्षांत दिसू लागतात. दहा वर्षांनी व्यक्ती निर्व्यसनी व्यक्तीसारखीच ठणठणीत होते, असे टोरंटो विद्यापीठाच्या सार्वजनिक आरोग्य विभागातील संशोधकांनी या अहवालात नमूद केलंय. याचाच अर्थ, चाळिशी जवळ आलेल्या व्यक्तींवर लक्ष केंद्रित केले पाहिजे. संशोधकांनी दीड कोटी प्रौढ व्यक्तींचा अभ्यास १५ वर्षांपेक्षा अधिक काळ करून असं सांगितलंय की, ४० ते ७९ वर्षे वयोगटातील धूम्रपान करणार्यांना मृत्यूचा धोका धूम्रपान न करणार्यांपेक्षा तिप्पट अधिक असतो. त्यांना सुमारे १२ ते १३ वर्षांच्या आयुष्यावर उदक सोडावे लागते. चाळिशीत धूम्रपान सोडणार्या व्यक्तींनी अकाली मृत्यूचा धोका जवळजवळ ३० टक्क्यांनी कमी केल्याचे निरीक्षण संशोधकांनी नोंदवलंय. म्हणूनच, सिगारेटचे व्यसन सोडायला आता उशीर झाला, असं कुणी समजता कामा नये.

# महायुतीमध्ये भारतीय जनता पार्टीची बिकट अवस्था

**पुणे । वृत्तसेवा**

राज्यात सत्तेवर असलेल्या भाजपप्रणित महायुतीत आधीच तीन मोठे पक्ष आले आहेत. शिवसेनेचा शिंदे गट आणि राष्ट्रवादीचा अजित पवार गट यांच्या बरोबरच आता राज ठाकरेंची मनसेही या युतीत सामील होण्याच्या चर्चा आज चांगल्याच रंगल्या. भाजपचे एक ज्येष्ठ नेते अशिष शेलार यांनी राज ठाकरे यांची त्यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतल्यानंतर या चर्चेला उधाण आले. या चर्चेने विरोधकांच्या आघाडीच्या पोटात गोळा येण्याऐवजी महायुतीतील नेत्यांच्याच पोटात गोळा आला असण्याची शक्यता अधिक आहे. या युतीतील सदस्यांना सामावून घेताना भाजपच्या राज्यातील नेत्यांची चांगलीच दमछाक होणार हे अगदी सरळ आहे. त्याहीपेक्षा महत्त्वाची बाब म्हणजे मूळच्या भाजपच्या लोकांच्या संधी आता आणखी कमी होण्याची शक्यता असल्याने त्यांच्यात कमालीची अस्वस्थता निर्माण होणेही अगदी स्वाभाविक आहे. वास्तविक राज्यातील सध्याच्या सरकारकडे दोनशेपेक्षा अधिक आमदार आहेत. संपूर्ण राज्यावर संख्याबळाच्या आधारे महायुतीचाच बोलबाला आहे, असे असताना अशा नवनवीन पक्षांना महायुतीत घेण्याचे जर प्रयत्न सुरू असतील, तर या युतीत नजिकच्या काळात राजकीय संदोपसुंदी मोठ्या प्रमाणावर होऊ शकते हे सांगायला कोणा राजकीय भाष्यकाराची गरज नाही. लोकसभेच्या जागा वाटपातून होणार्या वादातून फार मोठी बंडखोरी होण्याची शक्यता नसते कारण लोकसभेचा मतदार संघ मोठा असतो तेथे बंडखोर म्हणून स्वतंत्र निवडणूक लढवणे जिकिरीचे असते त्यामुळे त्या निवडणुकीत बंडखोरी होण्याचा धोका फारसा नसला तरी आयत्यावेळी महायुतीतील तिकीट नाकारलेले मातब्बर दुसर्या पक्षातून उमेदवारी मिळवण्याचा धोका कायम राहतोच. पण हाच विषय लोकसभेनंतर येणार्या विधानसभांच्या निवडणुकीत आणखी उग्र होऊ शकतो त्यावेळी खर्या अर्थाने या तथाकथित महायुतीची कसोटी लागणार आहे. महापालिका पातळीवरच्या निवडणुकांविषयी तर बोलण्याची सोयच उरली नाही, अशी स्थिती आहे. त्यामुळे एका अर्थाने हा एक मोठाच राजकीय विचका ठरणार आहे. मुळात विषय असा आहे की राज्यात मोठे पाठबळ असताना अशी फोडाफोडी करून भाजपला अजून काय साधायचे आहे हे लक्षात येत नाही. लोकसभा निवडणुकीत भाजपला महाराष्ट्रात अजूनही मोठा धोका असल्याचीच ही लक्षणे मानली जात आहेत, त्यामुळे अजूनही काँग्रेस व अन्य पक्षाच्या नेत्यांना फोडणे आणि मनसे सारख्या पक्षांना आपल्या बाजूला वळवण्याचे प्रकार सुरू आहेत. पण त्याचा अंतिम परिणाम मात्र ही युती फुटण्यातच होईल हेही स्पष्ट आहे. या सगळ्या धांदलीत मूळ भाजपच्या निष्ठावानांना कोणी विचारणारा आहे की नाही, असा प्रश्नही दबक्या आवाजात विचारला जाऊ लागला आहे. काही जणांनी त्यासाठी उघड आवाज उठवणे सुरूही केले आहे. भाजपचे ज्येष्ठ नेते माधव भांडारी यांना राज्यसभा निवडणुकीत पुन्हा डावलण्यात आल्यानंतर त्यांच्या मनातील खदखद त्यांच्या चिरंजीवांनी जाहीरपणे व्यक्त केली आहे. त्यांचे एक निवेदन वृत्तपत्रांमध्ये अलीकडेच प्रसिद्ध झाले आहे. ही महायुतीच्या विचक्याची सुरुवात मानावी लागेल. मूळ भाजपच्या निष्ठावानांनी अशी उद्विग्नता व्यक्त करणे अत्यंत स्वाभाविक आहे, कारण त्यांनी पक्षाला काहीही भवितव्य नसलेल्या काळापासून खस्ता खाल्ल्या आहेत. आता पक्षाला सुगीचे दिवस आल्यानंतर बाहेरून येणारेच पुन्हा सत्तेची पदे मिळवणार असतील, तर या सुगीचा आपल्याला उपयोग काय अशी प्रतिक्रिया त्यांच्या मनात निश्चित असणार. अगदी परवाच्याच राज्यसभा निवडणुकीचे चित्र लक्षात घेतले तरी ही बाब चटकन लक्षात येईल. राज्यसभेच्या सहा जागांसाठी ही निवडणूक होती आणि ते सहाही जण बिनविरोध विजयी झाले आहेत. पण त्यातील चार जण मूळ काँग्रेसी आहेत. अशोक चव्हाण, मिलिंद देवरा, प्रफुल्ल पटेल आणि काँग्रेसचेच चंद्रकांत हंडोरे राज्यसभेवर गेले आहेत. महायुतीचे विधानसभेत दोनशेपेक्षा अधिक आमदार असताना भाजपवर बाहेरच्यांना सत्तापदे देण्याची वेळ येण्याचेच कारण नव्हते, अशी निष्ठावंतांची धारणा झाली असणार आणि त्यातून त्यांच्यात निर्माण झालेली खदखद नजिकच्या काळात केव्हाही बाहेर पडू शकते. त्यामुळे एका अर्थाने महाराष्ट्रातील भाजप एका सुप्त ज्वालामुखीवर उभा आहे, असेही म्हणता येईल. ही स्थिती भाजप श्रेष्ठी का लक्षात घेत नसावेत हाही एक प्रश्न आहे. त्यात आता मनसेलाही बरोबर घ्यायच्या हालचाली सुरू झाल्या असतील तर सगळाच मामला आणखी बिकट होऊन बसणार आहे. ते जर बरोबर आलेच तर त्यांना काय देणार याचीही चर्चा सुरू होणार. भाजपच्या विधानसभेत सर्वाधिक जागा असताना मुख्यमंत्रिपद त्यांच्याकडे नाही. मंत्रिपदाचा सर्वात मोठा वाटाही शिंदे गट आणि अजित पवार गटाकडे गेलेला आहे. असे असताना भाजपचे आमदार किंवा अन्य इच्छुक आता आणखी किती कळ सोसणार हाही मुद्दा आहे. भाजपच्या वळचणीला जाऊन मनसेला फार राजकीय लाभ होण्याची शक्यता दिसत नाही. मनसे हा एक चांगला पक्ष वेळोवेळी घेतलेल्या चुकीच्या भूमिकांमुळे अस्तित्वहीन होण्याच्या वाटेवर आहे. वास्तविक जेव्हा शिवसेना भाजपपासून दूर झाली त्याचवेळी मनसेने भाजपशी जुळवून घेतले असते तर ते फायद्यात राहिले असते आणि त्यांचा दबदबाही कायम राहिला असता, पण त्यावेळी राज ठाकरेंची मुलुख मैदानी तोफ मोदींवर टीका करण्यात व्यस्त राहिली. त्यामुळे त्यांची ही संधी हुकली. आता पुन्हा काही अडचणींमुळे त्यांना भाजपबरोबर जावे लागणार असेल तर त्यांच्या पदरात फार काही पडण्याची शक्यता नाही. त्यामुळे अर्थातच पुन्हा चुकीच्या भूमिकेमुळे मनसे अडचणीत येणार हे स्पष्ट आहे. राज ठाकरे हे स्वयंभू नेते आहेत, त्यामुळे त्यांना कोणातरी राजकीय जाणकारांचा सल्ला घेऊन पावले टाका असा सल्ला देणे निरर्थक आहे. मनसेला लोकसभा किंवा विधानसभेला फार जागा देण्यापेक्षा त्यांना मुंबई महापालिका निवडणुकीत वापरून घेण्याचा भाजपचा डाव दिसतो आहे. पण महाराष्ट्रातील या मोठ्या प्रादेशिक पक्षाला एवढासा लाभ परवडेल काय याचाही विचार त्यांना करावा लागेल. या सगळ्या राजकीय खेळ्यांमुळे महाराष्ट्राच्या राजकारणाचा चिखल होऊ लागला आहे. अगदी थेट भाषेत सांगायचे तर महाराष्ट्राचे राजकारण नासत चालले आहे आणि त्याला बहुतांशी भाजपच जबाबदार आहे.

## पान १ वरून

### महायुती सरकारच्या

काँग्रेसने हल्लाबोल केला. पुणे पोलिसांच्या इतिहासातील सगळ्यात मोठी कारवाई मागील दोन दिवसांत झाली आहे. विद्येचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्यात हजारो कोटींचे ड्रग्ज सापडले. सरकारच्या नाकर्तेपणामुळे पुण्याला ड्रग्जचा विळखा पडला आहे. महायुती सरकारच्या काळात ड्रग माफियांचा सुळसुळाट वाढला असून सरकारची डोळेझाक कशासाठी; ड्रग माफियांना कुणाचा आशीर्वाद आहे, असा संतप्त सवाल विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला. दरम्यान, राज्यातील तरुणाईला वाचविण्यासाठी ड्रग माफियांचा सरकारने वेळीच बंदोबस्त केला पाहिजे. सरकारने धडक कारवाई करून जरब बसविली पाहिजे. अन्यथा हे ड्रग माफिया तरुणाईला देशोधडीला लावतील. सरकारने याकडे डोळेझाक करू नये. ज्यांच्या आशीर्वादाने ड्रग रॅकेट सुरु आहे त्यांच्या देखील मुस्क्या सरकारने आवळल्या पाहिजेत. सरकारने ड्रग प्रकरण गांभीर्याने घेऊन दोषींवर कडक कारवाई करावी अशी मागणी विजय वडेट्टीवार यांनी केली.

### बारावीच्या परिक्षेत

झाला नाही. पोलिसांचेही योग्य नियोजन होते, असे सरस्वती विद्यालयाचे प्राचार्य शिंदे यांनी सांगितले. इतर काही प्रश्न विचारण्याआधीच त्यांनी फोन कट केला. त्यानंतर वारंवार संपर्क केला असता त्यांनी फोन घेतला नाही. प्राचार्य शिंदे यांनी बोलण्यास टाळाटाळ केल्याने गैरप्रकाराबाबत संशय वाढला आहे.

### लोकसभा

परभणी, हिंगोली हे तीन मतदारसंघ ठाकरे पुन्हा लढवणार हे जवळपास स्पष्टच होते. हिंगोलीच्या जागेवरून काँग्रेस आणि शिवसेनेत रस्सीखेच सुरू होती.

# भाजपचे लोकशाही विरोधी काम

**नांदेड । वृत्तसेवा**

केंद्रीय तपास यंत्रणांचा दुरुपयोग करून विरोधी पक्षाचे सरकार पाडणे, नेत्यांवर दबाव आणून फोडने व पक्षात प्रवेश देणे, असे लोकशाहीविरोधी काम भाजप करीत आहे. भाजप लोकशाहीसाठी कलंक आहे, असा घणाघात माजी मंत्री शिवाजीराव मोघे यांनी मंगळवारी (ता २०) भाजपवर केला. तसेच ज्या सर्वाधिक मताधिक्याने पाच जागा काँग्रेसच्या येतील, त्यात नांदेडच्या जागेचा समावेश असेल, असा विश्वास मोघे यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला. अशोक चव्हाण यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर काँग्रेसचे खूप मोठे नुकसान झाले आहे. नांदेड जिल्ह्यात संभाव्य पडझड थांबवून पक्षाला उभारी देण्यासाठी पक्ष निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. माजी मंत्री शिवाजीराव मोघे, अनिल पटेल यांनी नांदेड येथील पक्ष कार्यालयात जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक घेऊन पक्षाचा संघटनात्मक पातळीवर परिस्थितीचा आढावा घेतला. तसेच विधानसभानिहाय पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधत मते जाणून घेतल्यानंतर माध्यमांशी संवाद साधला. या वेळी जिल्हाध्यक्ष गोविंदराव शिंदे - नागेलीकर, माजी आमदार हनुमंतराव पाटील - बेटमोगरेकर, माजी आमदार ईश्वरराव भोसीकर आदी उपस्थित होते. शिवाजीराव मोघे म्हणाले, नांदेड हा कोण्या नेत्याचा बालेकिल्ला नव्हता. तो काँग्रेसचा बालेकिल्ला आहे. आमच्यासाठी लोकसभा निवडणूक महत्त्वाची आहे. अशोक चव्हाण भाजपमध्ये गेले असले तरी पदाधिकारी व कार्यकर्ते, सामान्य नागरिक काँग्रेससोबत आहेत.

# जिल्ह्यात ११० केंद्रांवर बारावी परीक्षेचे आयोजन

**नगर । वृत्तसेवा**



महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणारी बारावीची परीक्षा बुधवारपासून (दि. २१) सुरू होत असून, यासाठी ६४ हजार विद्यार्थी प्रविष्ट झाले आहेत. जिल्ह्यात ११० केंद्रांवर परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. माध्यमिक शिक्षण विभागाने परीक्षेची सर्व तयारी केली आहे. परीक्षेतील गैरप्रकाराला आळा बसावा म्हणून जिल्हास्तरावर ७ भरारी पथके तैनात करण्यात येणार आहेत. याशिवाय गणित, इंग्रजी या विषयांच्या पेपरला प्रत्येक परीक्षा केंद्रावर गटशिक्षणाधिकारी कार्यालयामार्फत बैठे पथक नियुक्त केले जाणार आहे. गणित, इंग्रजी या पेपरच्या दिवशी संवेदनशील केंद्रांवर व्हिडीओ चित्रीकरण केले जाणार आहे. दरम्यान, परीक्षेच्या अनुषंगाने परीक्षा केंद्रावर कॉपी होणार नाही, याची सर्वच यंत्रणांनी खबरदारी घ्यावी. जर केंद्रावर कॉपी झालेली आढळली तर केंद्र संचालकांवर कारवाई करण्यात येईल, असे आदेश जिल्हाधिकारी सिद्धाराम सालिमठ यांनी दिलेले आहेत. उपद्रवी केंद्रांना परीक्षा कालावधीत विशेष करून भेटी देऊन गैरप्रकारांस आळा घालावा, प्रत्येक परीक्षा केंद्रावर तहसीलदार, गटविकास अधिकारी यांच्या भेटी व्हाव्यात, या पथकाने परीक्षा तणावमुक्त वातावरणात पार पडतील, असे प्रयत्न करावेत, उपस्थित पर्यवेक्षकांमार्फत विद्यार्थ्यांची झडती केंद्रावर घेण्यात यावी, जिल्ह्यातील सर्व परीक्षा केंद्रांवर पुरेसा पोलिस बंदोबस्त देण्यात यावा, परीक्षा केंद्रावर इलेक्ट्रॉनिक्स साधनांच्या वापरावर प्रतिबंध करावा, परीक्षा केंद्र परिसरातील सर्व झेरॉक्स सेंटर पेपरच्या कालावधीत बंद ठेवावेत, परीक्षा केंद्रावरील बैठे पथकाच्या भेटी वाढवाव्यात, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या आहेत. यंदा बारावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १९ मार्चदरम्यान होणार आहे. पहिलाच पेपर इंग्रजीचा असून सकाळी ११ ते २ या वेळेत हा पेपर होईल. या परीक्षेसाठी ६४ हजार ४७ विद्यार्थी प्रविष्ट झाले आहेत. तर जिल्ह्यात ११० केंद्रांवर परीक्षेची बैठक व्यवस्था करण्यात आली आहे. एकूण २२ दिवस बारावीची परीक्षा चालणार आहे. प्रश्नपत्रिकेची पाकिटे ताब्यात घेतल्यापासून प्रश्नपत्रिका वितरित करेपर्यंतचे चित्रीकरण मोबाइलमध्ये करण्यात येणार आहे, तसेच प्रश्नपत्रिकांच्या वाहतुकीवेळी 'जीपीएस' प्रणालीचा वापर केला जाणार आहे. विद्यार्थ्यांना परीक्षेच्या निर्धारित वेळेनंतर दहा मिनिटे वाढवून देण्यात आली आहेत. विद्यार्थ्यांनी सकाळच्या सत्रात साडेदहा वाजता, तर दुपारच्या सत्रात अडीच वाजता परीक्षा केंद्रावर उपस्थित राहायचे आहे. जिल्ह्यात १८ संवेदनशील केंद्र घोषित केलेले असून तेथे भरारी पथकांसह इतर यंत्रणेची करडी नजर असेल. त्यात नगर शहरातील दोन, तर इतर १४ केंद्र तालुकास्तरावरील आहेत. कॉपीमुक्त अभियानाअंतर्गत बारावी परीक्षेची सर्व तयारी झालेली आहे. परीक्षेतील गैरप्रकाराला आळा बसावा म्हणून जिल्हास्तरावर ७ भरारी पथके, बैठे पथके तैनात करण्यात आली आहेत. विद्यार्थ्यांनी अर्धा तास आधी परीक्षा केंद्रावर हजर राहावे.

# राज्यातील २१३३ बस फेऱ्या रद्द

**नागपूर । वृत्तसेवा**

मराठा आरक्षणाच्या संदर्भाने मनोज जरांगे-पाटील यांनी सुरू केलेल्या उपोषणादरम्यान संतप्त आंदोलकांकडून जाळपोळ, दगडफेक आणि रास्ता रोको केला गेल्याने एसटी महामंडळाला जबर फटका बसला आहे. या पार्श्वभूमीवर, आजपासून पुन्हा बंद केलेल्या एसटी बसेसच्या फेऱ्या पूर्ववत सुरू करण्यात आल्या असल्या तरी गेल्या आठवडाभरात एसटीच्या दोन हजारांवर फेऱ्या रद्द करण्यात आल्या होत्या. त्यामुळे महामंडळाला सुमारे ७५ लाखांचे नुकसान झाले आहे. मराठा आरक्षणाचा विषय आणि त्या पार्श्वभूमीवर मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सर्वत्र लक्षवेधी ठरले आहे. यावेळी अंतरवाली सराटीत पुन्हा जरांगे पाटील उपोषणाला बसले होते. त्यानंतर पाच दिवसांनी उपोषणाचे पडसाद उमटायला सुरूवात झाली. मराठवाड्यात अनेक गाड्यांवर दगडफेक, तोडफोड, जाळपोळ, रस्ता रोको करण्यात आल्याने राज्यातील बहुतांश जिल्हा मुख्यालयातून मराठवाड्यात जाणाऱ्या एसटीच्या बसेस आगार प्रमुखांनी बंद केल्या. अधिकृत माहितीनुसार, राज्यातील ३१ जिल्हा मुख्यालयाने मराठवाड्यातील विविध शहरात जाणाऱ्या एकूण २१३३ बस फेऱ्या रद्द केल्या. परिणामी एसटी महांडळाला ७४ लाख, १९ हजार, ४१४ रुपयांचे नुकसान झाले. दरम्यान, सरकारने आज मराठा समाजाला १० टक्के आरक्षण जाहिर केल्याने आंदोलन निवळले असून, संपूर्ण राज्यातील बसफेऱ्या पूर्ववत झाल्याचे संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. आंदोलनाचा सर्वाधिक फटका राज्यातील एसटीच्या छत्रपती संभाजीनगर विभागाला बसला. या विभागात छत्रपती संभाजीनगर, बीड, जालना, लातूर, नांदेड, धाराशिव आणि परभणी असे एसटीचे सात जिल्हा मुख्यालये आहेत. त्यातून मराठवाड्यातील विविध गाव शहरात ९,६२६ बस फेऱ्या धावतात. आंदोलनाची तीव्रता बघता खबरदारीचा उपाय म्हणून गेल्या आठवडाभरात त्यापैकी २,०७० बसफेऱ्या बंद करण्यात आल्या होत्या.

# डोक्यात काठी घालून वृद्धेचा केला खून

**लातूर । वृत्तसेवा**

वृद्ध आईचा डोक्यात काठी घालून मुलाने खून केल्याची घटना लातुरातील वाल्मिक नगरात मंगळवारी घडली. याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात रात्री उशिरा गुन्हा दाखल केला असून, पोलिसांनी आरोपी मुलाला अटक केली आहे. लातुरातील वाल्मिक नगरात राहणाऱ्या सुभाषचंद्र कंदले (वय ८५) हे पत्नी आणि मुलासोबत वास्तव्याला आहेत. मंगळवारी आई प्रभावती (वय ७९) जेवण घेवून मुलगा पुनमचंद्र कंदले (वय ४०) याच्या खोलीत गेली. दरम्यान, मुलाने वृद्ध आईच्या डोक्यात काठी घातल्याने ती गंभीर जखमी अवस्थेत जाग्यावरच कोसळली. बाहेर वडिल अंथरुणावर पडून होते. बराच वेळ झाले, पत्नी खोलीतून बाहेर का आली नाही? असा प्रश्न त्यांना पडला. त्यांनी आपल्या दुसऱ्या मुलाला याची माहिती दिली. मुलगाही घरी दाखल झाला. मात्र, आरोपी मुलाने खोलीला आतून कडी लावली होती. याबाबतची माहिती एमआयडीसी ठाण्याच्या पोलिसांना देण्यात आली. घटनास्थळी दाखल झालेल्या पोलिसांनी खोलीचे दार उघडले. मृतावस्थेत पडलेल्या प्रभावती कंदले यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी लातूर शासकीय रुग्णालयात दाखल केला. घटनास्थळी डीवायएसपी भागवत फुंदे, पोलिस निरीक्षक एस.डी. नरवाडे यांनी भेट दिली. तपास सपोनि. देवकत्ते करीत आहेत. याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात जयकुमार कंदले (वय ४५) यांनी दिलेल्या तक्रारीवरुन मंगळवारी रात्री उशिरा गुन्हा दाखल केला असून, पोलिसांनी पुनमचंद्र कंदले याला अटक केली आहे.

# गाव चलो अभियान,कार्यकर्ता मेळावा संपन्न

**आष्टी । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीतर्फे व्यापक जनसंपर्कासाठी ''गाव चलो अभियान'' सुरू आहे.त्या अनुषंगाने भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, भाजपा राष्ट्रीय सचिव लोकनेत्या पंकजाताई मुंडे, खा.डॉ.प्रितमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली आष्टी विधानसभा मतदारसंघाचे माजी आ.भीमराव धोंडे यांनी मच्छिंद्रनाथ नाथाचे दर्शन घेऊन मच्छिंद्रनाथांच्या पावणभूमीत गाव चलो अभियान हाती घेतले असून ठिकठिकाणी कार्यकर्ते मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.मोदी सरकारचे प्रभावी कामे घराघरात धोंडे पोहोचवत आहेत.मोदी जगात प्रसिद्ध असून पुन्हा पंतप्रधान करण्यासाठी व प्रितमताईं मुंडे खा. करण्यासाठी सरकारचे कामे पोहचवणे गरजेचे आहे.भारत देश मोदींच्या नेतृत्वाखालील प्रगतशील देश म्हणून १२ व्या क्रमांकावरून ५ क्रमांकावर आला आहे.३ क्रमांकावर आणण्याचा मोदींचा मानस आहे.लोकसभेला प्रितमताईंना साथ द्यावी मोठ्या प्रमाणावर खा. प्रितमताईंच्या नेतृत्वाखाली विकास कामे झाले आहेत असे प्रतिपादन माजी आ. भीमराव धोंडे यांनी केले ते दि.२० फेब्रुवारी रोजी सावरगांव येथे गाव चलो अभियानात कार्यकर्ता बैठक प्रसंगी बोलत होते.त्यांनी विविध घटकांशी संवाद साधला विचारांची देवाणघेवाण होत आहे.त्यांच्या या अभियानाला नागरीकांनी कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.यावेळी व्यासपीठावर भाजपा युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस अजयदादा धोंडे, युवा नेते अभयराजे धोंडे,भाजपा तालुकाध्यक्ष ड. साहेबराव म्हस्के, जि.प.सदस्य वर्षा माळी, अशोक साळवे,सरपंच पंढरीनाथ चंदनशिव, विष्णुपंत वायभासे, सरपंच दादासाहेब जगताप यांच्या सह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माजी आ.भीमराव धोंडे यांनी पुढे बोलताना म्हणाले की,उपस्थित कार्यकर्ते,गटप्रमुख,

गणप्रमुख, शक्तीकेंद्र प्रमुख,बुथप्रमुख यांनी मोदी यांनी १० वर्षात विविध कल्याणकारी योजना राबविलेल्या घराघरात पोहचवा खा.

प्रितमताई मुंडे यांनी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर विकास केला आहे. त्यांना पुन्हा खासदार करण्यासाठी त्यांची कामे सर्वसामान्य नागरीकांपर्यंत पोहचवणे गरजेचे आहे.सरकारने पिक विमा १ रुपयात मोफत दिला जात आहे. रेल्वे आष्टीपर्यंत धावत आहे.लवकरच परळी पर्यंत धावेल,विकास कामात भारतीय जनता पार्टीने वेग घेतला आहे.मागच्या काळात कोणत्याच पक्षाने वेग घेतला नाही,अयोद्याचे भव्य दिव्य मंदीर साकारले गेले आहे.

# सिध्दिविनायक प्रतिष्ठानच्यावतीने सत्कार संपन्न



**जामखेड । प्रतिनिधी**

जामखेड शहरातील तपनेश्वर रोड येथील सिध्दिविनायक प्रतिष्ठानचा नेहमीच शैक्षणिक, सामाजिक,क्रिडा,धार्मिक अशा विविध क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणार्या व्यक्तींचा सन्मान केला जातो.यातुन समाज जागृती होऊन एक उत्तम आणि आदर्श असा जामखेड परीसराचे सर्वत्र यशश्वी विभाग म्हणुन पुढे यावा हाच प्रतिष्ठानचा हेतु आहे. असे मत प्रतिष्ठान चे अध्यक्ष सुरेश देशमुख उर्फ सुंदर काका यांनी व्यक्त केले. जामखेड शहरातील धनराज पवार हे मास कम्युनिकेशन व जर्नालिझम परिक्षेत उत्तीर्ण झाल्याबद्दल आज रोजी श्री सिध्दिविनायक प्रतिष्ठान जामखेड यांच्या वतीने यांचा सत्कार यावेळी प्रतिष्ठान चे अध्यक्ष सुरेश रामचंद्र देशमुख उर्फ सुंदरकाका यांच्या हस्ते करण्यात आला.यावेळी सचिव सचिन देशमुख , सुहास देशमुख, पत्रकार संजय वारभोग,देविदास महाडीक, सचिन शिंदे, संतोष वीर आदी उपस्थित होते.

## जाहिर प्रगटन

**मा. श्रीमती एस. एस. पिंगळे दिवाणी न्यायाधीश.व स्तर बीड यांच्या न्यायालयात,**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २४३/२०२४**
**नंदुबाई मुंडे वि.निरंक**

**अर्जदार - १) नंदुबाई भ्र. नारायण मुंडे, वय ५९ धंदा घरकाम, रा. दत्तनगर आदर्श गणेशनगर, बीड,ता.जि.बीड, २) मिनाक्षी भ्र. बाबासाहेब चाटे, वय ५०, धंदा घरकाम, रा. बालाघाट कॉलनी कॅनॉल रोड, बीड, ता.जि.बीड, ह.मु. बंकटस्वामी नगर बीड, ता.जि.बीड.**

**विरूध्द निरंक**

**प्रकरण - भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **असराबाई शंकर चाटे** यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. **मयत असराबाई शंकर चाटे** हे दिनांक १२/१२/२०२३ रोजी राहते घरी दत्तनगर आदर्श गणेशनगर, बीड, ता.जि.बीड येथे मयत झालेल्या आहेत. अर्जदार क्र. १ ही मयताची मुलगी असून अर्जदार क्र.२ ही मयताची सुन आहे. **मयताचे पती नामे शंकर अप्पाराव चाटे** हे दिनांक १०/१०/९३ रोजी मयत झाले असून **मयताचा मुलगा नामे बाबासाहेब शंकर चाटे** हे दिनांक २३/०७/९४ रोजी मयत झालेले आहेत. वरील अर्जदाराशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत तसेच त्यांच्या स्थावर व जंगम मिळकतीसंबंधी मृत्यूपत्र बनवलेले नाही अथवा कोणालाही नामनिर्देशीत केलेले नाही असे अर्जदाराचे म्हणणे आहे. अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे . त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार क्र. १ वे ३ हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी . जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याने वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**पुढील तारीख १३/०३/२०२४**
**आज दिनांक ०६/०२/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.**

कोर्टाचा शिक्का

मार्फत्र
अॅड. जी.एस.घुगे

आदेशावरून.
स्वाक्षरीत/-
अधिक्षक, दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड.

# सोनिया गांधी बिनविरोध राज्यसभेवर



**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी यांनी राजस्थानातून राज्यसभेवर पोहोचल्या आहेत. आज त्यांची राज्यसभेच्या खासदारकीसाठी बिनविरोध निवड झाली. सोनिया गांधींसोबतच, भाजपचे चुन्नीलाल गरसिया आणि मदन राठोड हे देखील राजस्थानातून बिनविरोध निवडून आले. राज्यसभा निवडणुकीसाठी निर्णय अधिकारी असलेले विधानसभेचे प्रधान सचिव महावीर प्रसाद शर्मा यांनी राजस्थानातून सोनिया गांधींसह तिन्ही उमेदवारांची राज्यसभेच्या निवडणुकीसाठी बिनविरोध निवड झाली आहे. माजी पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग राजस्थानमधून राज्यसभेवर निवडून आले होते. त्यांचा कार्यकाळ तसेच भाजपचे नेते भूपेंद्र सिंग राज्यसभेचा कार्यकाळ तीन एप्रिल रोजी संपत आहे. भाजपचे राज्यसभा सदस्य किरोरीलाल मीना यांनी आमदार म्हणून निवडून आल्यानंतर डिसेंबरमध्ये खासदारकीचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर ही निवडणूक झाली. राज्यसभा निवडणुकीसाठी राजस्थानमध्ये तीन जागांवर चुरशीची लढत अपेक्षित होती. मात्र, अंतिमतः काँग्रेसतर्फे वरिष्ठ नेत्या सोनिया गांधी आणि भाजपतर्फे चुन्नीलाल गरसिया आणि मदन राठोड अशा तीन उमेदवारांनीच अर्ज भरल्यामुळे बिनविरोध निवडीची केवळ औपचारिकता उरली होती.

# विदेशी मद्याची तस्करी करणाऱ्याला ठोकल्या बेड्या

**मुंबई । वृत्तसेवा**

गुजरातमधील सुरत येथे विदेशी मद्याची तस्करी करणाऱ्या वाहनावर मुंबई – आग्रा महामार्गावरील घोटी टोलनाका परिसरात पोलिसांनी सापळा रचून कारवाई केली आहे. या कारवाईत तब्बल १ लाख ८ हजार रुपयांच्या विदेशी मद्यासह सुमारे १२ लाख रुपये किंमतीचे चारचाकी वाहन असा सुमारे १३ लाख ८ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. तसेच चारचाकी वाहनाचा चालक संशयित किरीट हरीलाल बारैय्या (रा. सुरत, गुजरात) याला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. याबाबत अधिक माहिती अशी की, गुजरात राज्यातील सुरत येथे



नेण्यासाठी मुंबई – आग्रा महामार्गावरून चारचाकी वाहनातून विदेशी मद्याची चोरटी वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांना मिळली होती. या माहितीच्या आधारे पोलीस उपनरीक्षक अनिल ढोमसे व पोलीस पथकाला घोटी टोल नाक्यावर तैनात करून सापळा लावण्यात आला होता. यावेळी पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार मद्याची चोरटी वाहतूक सुरू असताना पोलिसांनी कारवाई करीत मद्याची अवैध वाहतूक करणाऱ्या संशयित वाहनाला अडविले. या वाहनाची तपासणी केली असता त्यात लाखो रुपयांचा विदेशी मद्याच्या बाटल्या आढळून आल्या. पोलिसांनी हा मद्यसाठा जप्त केला आहे. या कारवाईत संशयित वाहनाच्या चालकालाही अटक करण्यात आली आहे. त्याच्या चौकशीतून हा मद्यसाठा चारचाकी वाहनातून गुजरात राज्यातील सुरतकडे तस्करी करण्यात येत असल्याची माहिती समोर आल्याचे पोलिसांनी सांगितले. याप्रकरणी पोलीस शिपाई सतिष चव्हाण यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, घोटी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संशयित कारचालक किरीट हरीलाल बारैय्या याला अटक करण्यात आली आहे. या कारवाईत कारमध्ये १ लाख ८ हजार रुपये किंमतीच्या विविध कंपनीच्या विदेशी मद्याच्या व्हिस्कीच्या बाटल्या आढळून आल्या. त्यामुळे पोलिसांनी या मद्यसाठ्यासह सुमारे १२ लाख रुपये किंमतीचे चारचाकी वाहनही हस्तगत केले आहे. तसेच मद्य लपविण्यासाठी या वाहनात छुपे कप्पे बनवण्यात आले होते. त्यात विदेशी मद्यसाठा लपवून तस्करी करण्यात केली जात होती, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

## राज्य शासनाच्या उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार २०२३ साठी प्रवेशिका पाठविण्याकरीता मुदतवाढ

**मुंबई । वृत्तसेवा**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात आलेली आहे. या स्पर्धेसाठी दिनांक १ जानेवारी, २०२३ ते ३१ डिसेंबर, २०२३ पर्यंतच्या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखन/छायाचित्रे/वृत्तकथा यांच्या प्रवेशिका मागविण्यात येत आहेत. प्रवेशिका पाठविण्याचा अंतिम दि. ३१ जानेवारी, २०२४ असा होता. या प्रवेशिका मागविण्याकरीता दि.२९ फेब्रुवारी, २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. राज्यातील विविध भागातील स्पर्धकांनी संबंधित जिल्हा माहिती कार्यालयाकडून तर मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील इच्छुकांनी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, तळमजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२, येथून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करुन घ्यावयाचे आहेत.

## भाजपचा लोकसभा जागा वाटपाचा फार्म्युला मान्य नाही -शिवसेना शिंदे गट



**मुंबई । वृत्तसेवा**

भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात लोकसभेचे जागावाटप कसे होणार, याची उत्सुकता राजकीय वर्तुळाला लागून राहिली होती. महायुतीच्या नेत्यांनी चर्चा केल्यानंतर आता लोकसभा जागावाटपाचा संभाव्य फॉर्म्युला समोर आला आहे. यामध्ये एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला १२ जागा असल्याचं समोर आले. त्यावरुन खासदार गजानन किर्तीकर यांनी प्रतिक्रिया दिली. हा फॉर्मुला आम्हाला मान्य नसल्याचं गजानन किर्तीकर यांनी सांगितलं. त्याशिवाय आम्ही भाजपच्या दावणीला बांधलेलो नाहीत, अशी संतप्त प्रतिक्रियाही व्यक्त केली. महायुतीमध्ये जागा वाटप सुरु झाल्याचं समोर आले. त्यांचा फॉर्मुलाही मीडियात आला. त्यानुसार, भाजप ३२, शिवसेना १२ आणि राष्ट्रवादी काँग्रेस ४ जागा लढतील, हे समोर आले. पण यावर आता एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे खासदार गजानन किर्तीकर यांनी नाराजी व्यक्त केली. बोलताना त्यांनी आक्रमक भूमिका मांडली. आम्ही काही भाजपच्या दावणीला बांधलो नाहीत, असं त्यांनी सांगितलं. महायुतीचा लोकसभेचा फॉर्म्युला कुठून आला मला माहित नाही. आमच्याशी कोणतीही चर्चा झालेली नाही. आम्हाला १२ जागांचा हा फॉर्म्युला मान्य नाही. २०१९ ला आम्ही २२ जागा लढलो होतो त्यात आम्ही ४ जागा हरलो. मग १२ जागा कशा घेणार, असा सवाल गजानन किर्तीकर यांनी उपस्थित केला. राष्ट्रवादी कॅाग्रेसला भाजप आणि शिवसेनेने आपल्या खात्यातल्या जागा द्याव्यात, असं म्हटलं जातेय. आम्ही भाजपच्या दावणीला बांधलेलो नाहीय. आम्ही जास्त जागा लढवण्यावर ठाम आहोत, असे गजानन किर्तीकर म्हणाले. सूत्रांच्या माहितीनुसार, महायुतीमध्ये लोकसभेला ३२-१२-४ या सूत्रानुसार जागावाटप होण्याची शक्यता आहे. यामध्ये भाजपच्या वाटयाला सर्वाधिक ३२ जागा येतील. तर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या वाट्याला १२ जागा येतील. तर अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला अवघ्या ४ जागांवर समाधान मानावे लागू शकते शिवसेनेचे सध्याचे विद्यमान खासदार आणि गेल्या निवडणुकीत लढवलेल्या मतदारसंघावर भाजपच्या नेत्यांनी दावा ठोकला आहे. शिवसेनेच्या १८ खासांदारांपैकी १३ खासदार शिंदेंसोबत आहेत. पण यातील काही मतदारसंघामध्ये भाजपनं तयारी सुरु केली आहे. महायुतीची जागावाटपाची चर्चा सध्या प्राथमिक स्वरुपात सुरु झाली आहे. यामध्ये भाजपनं ३२ जागांवर दावा ठोकलाय. तर एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेला १२ जागांवर समाधान मानावे लागू शकतं. त्यामुळे महायुतीमध्ये भविष्यात तिढा वाढू शकतो. एकनाथ शिंदें यांना विद्यमान खासदारांसोबत काही दिग्गजांसाठीही तिकिट हवं आहे. त्यामुळे शिंदेवरील दबाव वाढू शकतो. दरम्यान, महायुतीमध्ये मित्रपक्षांकडील मतदारसंघांमध्येही भाजपनं तयारी केली आहे. येथील भाजपच्या काही नेत्यांनी त्यावर दावा ठोकलाय.

# ५६४ किलो गांजा पोलिसांनी केला जप्त

**सोलापूर । वृत्तसेवा**

सोलापूर ग्रामीण पोलीस दलाने अंमली पदार्थच्या विरोधात मोठी कारवाई केली आहे. या दोन कारवायामध्ये पोलिसांना मोठे यश प्राप्त झाले आहे. ओदिसा आणि आंध्रप्रदेश या राज्यातून महाराष्ट्रात गांजा तस्करी करणाऱ्या सहा आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्याकडून तब्बल ५६४ किलो इतका गांजा जप्त केला आहे. सोलापूर तालुका आणि टेंभुर्णी पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या या कारवाईत पोलिसांनी सुमारे एक कोटी ३६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ओदिसा, आंध्रप्रदेश या राज्यातून गांजा या अंमली पदार्थाची चोरटी वाहतूक सोलापूर जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग क्रमाक ६५ वरून होत असते. याबाबत गोपनीय माहिती सोलापूर ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. १९ फेब्रुवारी रोजी सोलापूर तालुका हद्दीतून एका चार चाकी वाहनातून दोन व्यक्ती आंध्रप्रदेशमधून गांजा घेऊन बारामतीकडे जाणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेकडील पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर, सपोनि धनंजय पोरे आणि पोसई सुरज निंबाळकर आणि पथकाने सोलापूर ते पुणे जाणारे रोडवर कोंडी गावच्या हद्दीत सापळा रचला. यावेळी संशयित वाहनाचा पाठलाग करुन गाडी थांबवली. यामध्ये दोन व्यक्ती पिकअप गाडीमधून ४५९ किलो ३४० ग्रॅम गांजा घेऊन जात असल्याचे आढळून आले. या प्रकरणी अल्ताफ युनुस इनामदार, जमीर इब्राहिम शेख या दोन आरोपीना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून सुमारे १ कोटी ४६ हजार ९०० रुपयांचा अवैध



गांजा जप्त करण्यात आला आहे. टेंभुर्णी पोलीस ठाणे हद्दीतील मोडनिंब येथील मोडनिंब ते जाधववाडी रस्त्यावरुन दोन चार चाकी वाहनामधुन काही इसम गांजा हा अंमली पदार्थ घेवुन जाणार आहेत. अशी माहिती सोलापूर ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली. त्यावरून मोडनिंब ते जाधववाडी रस्त्यावर सापळा रचुन पाठलाग करून दोन चार चाकी वाहने थांबवून चालकांना ताब्यात घेतलं. या गाड्यात पोलिसांना १०५ किलो ३८० ग्राम गांजा आढळून आला. एकूण ३६ लाख ३६ हजरांचा मुद्देमाल जप्त करत पोलिसांनी चार आरोपीना अटक केलीय. कदीर आसीफ पठाण, प्रकाश संतोष बारटक्के, ऋषीकेश उर्फ बापु देवानंद शिंदे, संतोष तुकाराम कदम अशी अटक केलेल्या आरोपींचे नाव आहेत. ऑक्टोबर महिन्यात सोलापूर ग्रामीण पोलिसांनी मोहोळ तालुक्यातून चालणाऱ्या ड्रग्स रॅकेटचा भांडाफोड केला होता. सलग झालेल्या कारवायामध्ये ग्रामीण पोलिसांनी कोट्यावधी रुपयांचा एमडी ड्रग्स आणि त्यासाठी लागणारा कच्चा माल जप्त केला होता. या प्रकरणी पोलिसांनी ड्रग्स निर्मिती करणाऱ्या आंतरराज्य टोळीचा मुख्य सुत्रधारला कर्नाटकातल्या कलबुर्गी येथुन जेरबंद केले आहे तर, त्याच्या साथीदारास हैद्राबाद येथुन अटक केली आहे. या प्रकरणी आतापर्यंत १३ आरोपीना अटक केली आहे. या टोळीचा मुख्य सूत्रधार असलेला फय्याज शेख याला अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. शेख हा कर्नाटक, तमिळनाडु, आंध्रप्रदेश, राजस्थान या भागातील अशा प्रकारच्या गुन्हयाचा मुख्य सुत्रधार असुन याच भागात तो आपले अस्तित्व लपवुन राहत होता. तसेच आपली राहण्याची ठिकाणे सतत बदलत होता. त्यामुळे त्याचा सुगावा लागेपर्यंत पळून जाण्यात यशस्वी होता. १४ फेब्रुवारी रोजी हा आरोपी कर्नाटकतील कलबुर्गी येथे असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांची पथके कलबुर्गी येथे गेली आणि एका हॉटेलमध्ये त्याच्या मुसक्या आवळण्यात आल्या. तरी त्याच्या साथीदारास हैद्राबाद येथून अटक करण्यात आली. आरोपी फय्याज शेख हा दुसरी नापास आहे. मात्र त्याला विविध रसायनांचे तांत्रिक ज्ञान मोठ्या प्रमाणात आहे. त्याच आधारे तो वेगवेगळ्या राज्यात ड्रग्सचे रॅकेट चालवत होता. प्रामुख्याने एमआयडीसीमध्ये बंद असलेले कारखान्यात एमडी ड्रग्सची निर्मिती केली जातं होती. फय्याज शेखच्या विरोधात सोलापूरसह राज्यातील विविध जिल्ह्यात गुन्हे दाखल असून काही दिवसापूर्वीच तो केरळ येथील तुरुंगातून सुटला आहे. अशी माहिती पोलीस अधिक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी दिली.

# छत्रपती संभाजीनगरमध्ये जमावाकडून दगडफेक,पोलिसांकडून हवेत गोळीबार

**संभाजीनगर । वृत्तसेवा**

शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये मराठा समाजाला १० टक्के आरक्षण देण्यासाठी काल (२० फेब्रुवारी) विशेष अधिवेशनात विधेयक मंजूर करण्यात आले. परंतु, हे आरक्षण मराठा आंदोलक नेते मनोज जरांगे पाटलांना मान्य नाही. ओबीसीतूनच आरक्षण



मिळण्यासाठी त्यांची आग्रही मागणी आहे. त्याकरता ते पुन्हा एकदा आंदोलनाला बसणार आहेत. तर दुसरीकडे आगामी लोकसभा निवडणुकीकरता देशभर पक्षांतर मोहिमांना जोर आला आहे. महाराष्ट्रतही विरोधी पक्षातील नेते महायुतीत सामील होणार असल्याच्या चर्चा आहेत. यासह राज्यातील अनेक महत्वाच्या घडामोडी जाणून घ्या.

## बाजार समितीत कायमस्वपरूपी प्रशासक नेमणुकीचा निर्णय मागे घ्या -राजू शेट्टी

**मुंबई । वृत्तसेवा**

केंद्र सरकारने बाजार समितीच्या धोरणात बदल करून निवडणुका न घेता कायमस्वपरूपी प्रशासकाची नेमणूक करून कारभार चालविण्याचा निर्णय हा देशातील शेतकऱ्यांच्या अधिकारावर गदा आणणारा आहे. त्यामुळे केंद्र सरकारने तातडीने हा निर्णय मागे घ्यावा, अन्यथा २६ फेब्रुवारी रोजी राज्यातील बाजार समित्या बंद ठेवून या निर्णयास विरोध करणार असल्याची माहिती स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी बुधवारी दिली. केंद्र सरकार कृषी धोरणाबाबत अनेक चुकीचे निर्णय घेत आहे. ज्यामुळे देशातील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झालेले आहे. सध्या केंद्र सरकारने देशातील बाजारसमित्यांच्या निवडणुका न घेता कायमस्वरूपी प्रशासक नेमून कारभार करण्याचा निर्णय घेत आहे. शासन नियुक्त प्रशासक मंडळ म्हणजे सात बारा नावावर असणारे सत्ताधारी पक्षाचे कार्यकर्ते आणि निवडणुकीला देणग्या देणारे व्यापारी हेच त्या प्रशासक मंडळामध्ये असतील.

# लोकसभा निवडणुकीपूर्वी महाराष्ट्रात राजकीय भूकंप

**मुंबई । वृत्तसेवा**

आगामी लोकसभा निवडणुकीपूर्वी महाराष्ट्रात आणखी एक राजकीय भूकंप होईल. त्यामध्ये काँग्रेस आणि शरद पवार गटातील आमदार मोठ्याप्रमाणावर फुटतील, असा दावा राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते अमोल मिटकरी यांनी केला. गेल्या काही दिवसांमध्ये काँग्रेसच्या मिलिंद देवरा, बाबा सिद्दीकी आणि अशोक चव्हाण या बड्या नेत्यांनी पक्षांतर केले होते. यामुळे काँग्रेसच्या गोटात खळबळ माजली होती. परंतु, येत्या काही दिवसांमध्ये महाविकास आघाडीच्या गोटात यापेक्षा मोठा भूकंप होईल, असे मिटकरी यांनी सांगितले. ते बुधवारी मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलत होते. अमोल मिटकरी यांनी राजकीय भूकंपाच्या शक्यतेबाबत वाच्यता करताना खळबळजनक माहिती दिली. काँग्रेस आणि शरद पवार गटाचे काही आमदार राष्ट्रवादीच्या नेतृत्त्वाच्या संपर्कात आहेत. काही आमदारांनी अजित पवारांची भेटही घेतली आहे. यामध्ये काँग्रेसच्या ७ तर शरद पवार गटाच्या ५ आमदारांचा समावेश असल्याचे मिटकरी यांनी सांगितले. तसेच आगामी निवडणुकीत महाविकास आघाडीने राष्ट्रवादी काँग्रेसविरोधात कोणताही उमेदवार रिंगणात उतरवावा. पण त्याचा फायदा होणार नाही. अनिल तटकरे येऊ देत किंवा कोणी युगेंद्र-जोगेंद्र येऊ दे, आम्हाला फरक पडत नाही, असे अमोल मिटकरी यांनी म्हटले. काही दिवसांपूर्वीच अशोक चव्हाण यांनी भाजपमध्ये प्रवेश केला होता. काँग्रेसच्या अनेक आमदारांनी त्यांना संपर्क करून पाठिंबा दर्शवल्याची माहिती आहे. अशोक चव्हाण यांच्या निर्णयामुळे काँग्रेसमधील अनेक नाराज आमदारांना भाजपची दारे खुली झाल्याचे बोलले जाते. त्यामुळे लोकसभा निवडणुकीपूर्वी काँग्रेसचे आणखी १० ते ११ आमदार फुटू शकतात, अशी शक्यता वर्तविली जात आहे. शरद पवार यांच्या जवळचा मानला जाणारा बडा नेता लवकरच भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याचीही चर्चा सध्या रंगली आहे. या चर्चेचा रोख जयंत पाटील यांच्या दिशेने असल्याचे सांगितले जाते. जयंत पाटील आणि त्यांचा मुलगा भाजप नेत्यांच्या संपर्कात असून लवकरच ते पक्षांतर करतील, अशी कुजबूज राजकीय वर्तुळात सुरु आहे.

# स्व.मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेतून २३ कोटी ३७ लाख रुपये निधी वितरित

**परळी । प्रतिनिधी**

स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेचे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेत रूपांतर केल्यानंतर प्रथमच कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून या योजनेतील लाभार्थींना वितरित करण्यासाठी २३ कोटी ३७ लाख रुपये इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. पूर्वी सदर योजना ही स्वर्गीय गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजना या नावाने ओळखली जायची व या अंतर्गत विमा सुरक्षा म्हणून अपघात ग्रस्त शेतकऱ्यांना अपघातातील उपचारासाठी किंवा मृत्यू पश्चात त्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक सहाय्य म्हणून ठराविक रक्कम देण्यात येत होती, मात्र धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून महायुती सरकारच्या काळात या योजनेचे विमा योजनेतून सानुग्रह अनुदान योजनेत रूपांतरण करण्यात आले. यादरम्यानच्या खंडित कालावधीतील अपघात ग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना काही दिवसांपूर्वीच धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून तब्बल ४९ कोटी रुपये इतक्या



लाभाचे वितरण करण्यात आले होते. त्यांनंतर आता योजना नव्या रूपाने सुरू झाल्यापासूनच्या काळातील प्रलंबित प्रकरणे निकाली लावून त्यांच्या कुटुंबियांना लाभाचे वितरण करण्यासाठी २३ कोटी ३७ लाख इतका निधी आज उपलब्ध करुन देण्यात आलाय. दरम्यान सदर योजनेतील खंडित कालावधीत अपघात होऊन मृत्यू पावलेल्या परभणी जिल्ह्यातील एका शेतकऱ्याच्या कुटुंबीयांनी काही दिवसांपूर्वी धनंजय मुंडे यांची परळी येथील त्यांच्या संपर्क कार्यालयात जनता दरबार उपक्रमांतर्गत भेट घेऊन निधी अभावी लाभ मिळाला नसल्याबाबत विनंती केली होती. त्यांनंतर धनंजय मुंडे यांनी या योजनेचा संपूर्ण आढावा घेऊन खंडित कालावधीतील राज्यातील सर्व प्रकरणे निकाली काढत त्यासाठी ४९ कोटी रुपये निधी उपलब्ध करून दिला. त्याचबरोबर बदललेल्या योजनेतील २३ कोटी रुपये अनुदान देखील उपलब्ध करून दिले आहे.

# दरोड्याच्या तयारीतील गावठी कट्ट्यासह टोळी ताब्यात

**केज । प्रतिनिधी**

केज पोलिसांनी कारवाई करीत देशी बनावटीचा गावठी कट्टा व पाच जिवंत काडतुस जवळ बाळगुन दरोड्याच्या तयारीत असलेल्या सराईत टोळीस ताब्यात घेवुन सात आरोपीविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. २० फेब्रुवारी रोजी केजचे सहायक पोलीस अधीक्षक कमलेश मीना यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली आहे की, काही इसम हे रस्त्यावर लुटमार करण्याच्या उद्देशाने अंबाजोगाईकडुन नेकनूरकडे एक पांढऱ्या रंगाची सुझुकी कंपनीची ईर्टीगा चारचाकी ( चक-४६-उच्-१९३४ ) मध्ये बसून येत अशी बातमी मिळाल्याने त्यांनी त्यांचे कार्यालयातील पोना विकास चोपने, पोना अनिल मंदे, पोना दिलीप गित्ते, पोकॉ अशपाक ईनामदार, पोह भुंबे पोलीस स्टेशन केज येथील पोउपनि शिंदे, पोकॉ शहादेव म्हेत्रे, महादेव बहिरवाळ, पोकॉ प्रकाश मुंडे यांना सोबत घेवुन केज शहरामध्ये केज ते अंबाजोगाई रोडवर, तांबवेश्वर मेडीकल समोर रोडवर सापळा लावुन अंबाजोगाई कडुन येणाऱ्या पांढऱ्या



रंगाची ईर्टीगा गाडी ( चक-४६-उच्-१९३४ ) हिस आडवुन गाडीतील इसमांना ताब्यात घेवुन पोलीस स्टेशन येथे आणुन सदर इसमांची व गाडीची झडती घेतली असता सदर इसमांच्या ताब्यात एक देशी बनावटीचा गावठी कट्टा, पाच जिवंत काडतुस, एक रिकामी मॅग्झीन व गाडीमध्ये मध्यल्या शिटखाली एक लोखंडी रॉड, डिक्कीमध्ये एक लोखंडी रॉड, एक लोखंडी स्क्रू ड्राव्हर व एक लाकडी दांडका मिळुन आल्याने ते जप्त करण्यात आले आहेत. ताब्यात घेतलेल्या इसमा नावे गणेश पांडुरंग भोसले ( यशवंतराव चव्हाण चौक, अंबाजोगाई ), हरीश तोमर देवडिगा ( रा. बीजेगळी ता. करकला जि. फ्लाइंग स्टेट कर्नाटक एच.एस. मु. डोंबिवली, मुंबई जि. मुंबई ), नारायण मंगल करण ( रा. महेश ता. कृष्ण प्रसाद जी. पुरी राज्य ओडिशा कच. सायन मुंबई ), श्रीनिवास आशा अली बारगम ( संत ज्ञानेश्वर नगर गव्हर्मेंट कॉलनीच्या बाजुला बांद्रा पुर्व मुंबई ), श्रावण शिवाजी गायकवाड ( रा. बोरीवली मुंबई ), दिपक दशरथ चाटे उर्फ ताठे ( रा. आर. धर्मनाका कामगार नगर-२ मुंबई ), नामदेव परसू पोवार ( रा. कामोठा नवी मुंबई ता. पनवेल जि. रायगड ) अशी असून या ७ आरोपीविरुध्द पोना विकास चोपने यांचे फिर्यादीवरुन केज पोलीस स्टेशन येथे कलम ३९९ भादविसह कलम ३/२५ भारतीय हत्यार कायदा नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी गणेश पांडुरंग भोसले यासह इतर आरोपीवर सुध्दा अंबाजोगाई, मुंबई, ठाणे शहरामध्ये दरोडा, खुनाचा प्रयत्न, जबरी चोरी यासारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकुर, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांचे मार्गदर्शनाखाली केजचे सहाय्यक पोलीस अधीक्षक कमलेश मीना, पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन, पोलीस उपनिरीक्षक आनंद शिंदे, पोलीस कर्मचारी विकास चोपने, अनिल मंदे, दिलीप गित्ते, अशपाक ईनामदार, भुंबे, शहादेव म्हेत्रे, महादेव बहिरवाळ, प्रकाश मुंडे यांनी केली आहे. सदर गुन्हयाचा तपास कमलेश मीना व पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील हे करीत आहेत.

# निर्भीड पत्रकार संघाचे जिल्हास्तरीय पुरस्कार जाहीर

**माजलगाव । प्रतिनिधी**

निर्भीड पत्रकार संघाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षी माँ साहेब जिजाऊ रत्न जिल्हास्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आले असून यावर्षीचे जिल्हास्तरीय माँ साहेब जिजाऊ रत्न सूर्योदय चे संपादक गंगाधर काळकुटे व मनसे कार्यकर्त्या वर्षा जगदाळे अविनाश जाधव बीड यांचीतर नारायण डक, ज्ञानेश्वर गिलीबिले, माजलगाव, शितलताई मोरे, रविकांत देशमुख धारूर, शरीफ पाशा सय्यद, दीपक कांबळे केज ॲड संतोष पवार जयप्रकाश सोनवणे आंबेजोगाई, परळी विधानसभेचे संभाव्य उमेदवार बबन भाऊ गीते, दैनिक जगमित्र चे संपादक बालासाहेब कडबाणे,परळी, राठोड,के एम पवार, दत्ता वाकसे वडवणी, राजू मस्के आष्टी आदींची माँ साहेब जिजाऊ रत्न जिल्हा स्तरीय पुरस्कारासाठी निवड माजलगाव तालुक्याचे भूषण म्हणून दयानंद स्वामी राजकीय साप्ताहिक लोकप्रचाराचे संपादक दिगंबर सोळंके सहकार मधून अशोक सोळंके, शिक्षण विभागातून गणेश नवले कायदा तज्ञ प्रवीण अंभोरे समाज रत्न म्हणून ज्ञानेश्वर सरवदे वैद्यकीय रोहिणी थावरे तलाठी सीमाताई मिराशे सामाजिक कार्य भगवान सरवदे युवा सरपंच राज अर्जुन प्रगतशील शेतकरी कैलास मस्के तर उद्योजक म्हणून हाजी अज़हर नाईक यांची निवड करण्यात आली असून नावे जाहीर करण्यात आली आहेत. सदर पुरस्काराचे वितरण ४ मार्च २०२४ रोजी माजलगाव येथील वैष्णवी मंगल कार्यालयात मान्यवरांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती बीड विधानसभेचे लोकप्रिय आमदार संदीप भैया क्षीरसागर, माजलगाव तालुक्याचे माजी आमदार राधाकृष्णजी होके पाटील माजी आमदार मोहनराव काका सोळंके मा. ॲड संगीता ताई चव्हाण, रमेश रावजी आडसकर, मोहन दादा जगताप, बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक बाबुरावजी पोटभरे, निर्भीड पत्रकार संघाचे अध्यक्ष रुचिता रमण मलवारी आदींची प्रमुख उपस्थिती असणार आहे तर पाहुणे म्हणून शिवसेना शिंदेगट जी. प्र. अनिल दादा जगताप, भाई गंगा भीषण थावरे, युवा नेते जयसिंग भैया सोळंके, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजसाहेब देशमुख, तुळजाभवानी अर्बन बँकेचे संस्थापक चंद्रकांत शेजुळ भाजपा युवा नेतृत्व व कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती नितीन दादा नाईक नवरे उपविभागीय पोलीस अधिकारी धीरज कुमार बच्चू प्रसिद्ध व्याख्याते प्रदीप दादा सोळंके, प्रसिद्ध कवी प्रभाकर साळेगावकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत तरी जिल्हा स्तरावर उत्कृष्ट काम करणारे आणि तालुका स्तरावर आदर्श निर्माण करणारे माँ साहेब जिजाऊरत्न पुरस्काराने सन्मानित होत आहेत तो सोहळा पाहण्यासाठी तालुक्यासह जिल्ह्यातील जनतेने मोठ्या प्रमाणात उपस्थित राहावे असे आवाहन निर्भीड पत्रकार संघ माजलगावच्या वतीने करण्यात आले आहे.

# ओबीसी समाजाचा रास्ता रोको संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

ओबीसी आरक्षण अबाधित ठेवण्यात यावे या प्रमुख मागणीसाठी भगवानगडाच्या पायथ्याशी गेल्या सात दिवसांपासून आमरण उपोषण करण्यात येत आहे. आज ओबीसी कार्यकर्त्यांनी कीर्तनवाडी हायवेवर चार तास रास्ता रोको आंदोलन करून टायर जाळत शासनाचा निषेध केला. या आंदोलनामुळे काही वेळ वाहतूक ठप्प झाली होती. ओबीसी आरक्षण वाचवण्यासाठी भगवानगडाच्या पायथ्याशी असलेल्या कीर्तनवाडीत गेल्या सात दिवसांपासून ओबीसी बांधवांचे आमरण उपोषण सुरू आहे. आज आंदोलनकर्त्यांनी विशाखापट्टणम हायवेवरील कीर्तनवाडी जवळ रास्ता रोको आंदोलन केले. जवळपास चार तास रास्ता रोको आंदोलन सुरू होते. या आंदोलनामुळे महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती. आंदोलनकर्त्यांनी टायर जाळून शासनाचा निषेध केला.

# बीड-परळी महामार्गावर गतिरोधकासाठी निवेदन

**वडवणी । प्रतिनिधी**

बीड-परळी राष्ट्रीय महामार्गावर पुसरा फाट्यावर गेल्या अनेक वर्षांपासून गतिरोधक नसल्यामुळे अपघात घडुन अनेक जणांना प्राण गमवावे लागलेले असून तसेच याठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी असते, लहान मुले शिक्षणासाठी ये-जा करतात तरी हा फाटा अपघाताचे केंद्र बिंदू बनत आहे तरी अशा घटना टाळण्यासाठी या ठिकाणी रोडवर गतिरोधक बसविण्यात यावे अशी मागणी तहसीलदार यांना काल दि.२१ फेब्रुवारी रोजी दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे भाजपा वडवणी तालुका उपाध्यक्ष महादेव सावंत यांनी केली आहे. बीड-परळी हायवेवर पुसरा फाटा असुन या ठिकाणी अनेक दुकाने,दवाखाने झालेली असुन याठिकाणी बाजारपेठ निर्माण झालेली आहे त्यामुळे मोठ्या प्रमाणात गर्दी होत असून या फाट्यावर १० ते २० गावातील गावकरी यांचा संपर्क असुन खरेदी व आरोग्य उपचारासाठी नागरिकांना या ठिकाणीच यावे लागते तसेच शिक्षणासाठी लहान मुले, विद्यार्थ्यांना हि हाच येण्या जाण्याचा एकमेव मार्ग आहे त्यामुळे सदरील स्थळी भरपुर गर्दी होत असुन हायवे असल्यामुळे वाहनांचा वेग मोठ्या प्रमाणात असतो त्यामुळे मोठ्या प्रमाणात अपघात होण्याचे घटना मध्ये वाढ झालेली असुन आता पर्यंत अनेकांना अपघातात प्राण गमवावे लागलेले आहेत . तरी या ठिकाणी होणाऱ्या अपघाताच्या घटना टाळण्यासाठी गतिरोधक बसविण्याची आवश्यक आहे.तरी तात्काळ सार्वजनिक बांधकाम ( उपक्रम ) विभाग यांनी या गंभीर विषयी लक्ष देऊन गतिरोधक बसवावे नसता तीव्र आंदोलन करण्याचा इशारा तहसीलदार वडवणी,सा.बां.विभाग बीड,सा.बां. विभाग वडवणी यांना दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे महादेव सावंत भाजपा वडवणी तालुका उपाध्यक्ष, भाजप युवा मोर्चा वडवणी तालुका अध्यक्ष ईश्वर तांबडे , महादेव आंधळे,दादासाहेब तोगे, निवांत दराडे यांनी दिला आहे.

# शिक्षकाची गळफास घेऊन आत्महत्या

**केज । प्रतिनिधी**

गदळेवाडी ( ता. केज ) येथील सुहास मधुकर जाधव ( वय ३० ) हे गेवराई तालुक्यातील एका मूकबधिर शाळेवर शिक्षक होते. पत्नी व मुलीसह शाळेकडे वास्तव्यास होते. शाळेला दोन दिवसांच्या सुट्या आल्याने ते गावी आले होते. त्यांनी गावी जाण्यापूर्वी पत्नी व मुलीला सासुरवाडी सावंतवाडी ( ता. केज ) येथे सोडून ते एकटेच घरी आले. शनिवारी ( दि. १८ ) रात्री घरी झोपले असता सुहास जाधव यांनी आपल्या राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे रविवारी सकाळी उघडकीस आले. त्यांनी आत्महत्या का केली ? याचे कारण आणखी स्पष्ट झाले नव्हते. या घटनेची माहिती मिळताच नांदूरघाट चौकीचे जमादार अशोक मेसे, पोलीस नाईक रशीद शेख यांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठवून दिला. नांदूरघाट येथील ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करून अंत्यसंस्कार करण्यात आले.

# शासनाच्या विविध योजनांबाबत माहिती देण्यासाठी महाशिबीर

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या सहकार्याने तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय,जिल्हा परिषद कार्यालय, तालुका विधी सेवा समिती केज आणि तालुका विधिज्ञ संघ केज यांच्या संयुक्त विद्यमाने रवीवार दिनांक २५ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी २.०० या वेळेमध्ये सौभांग्य कार्यालय बीड, केज रोड मस्साजोग, ता. केज जि. बीड येथे सर्व शासकीय व निमशासकीय योजनांचे लाभ व त्याची माहिती देण्यासाठी महाशिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन जिल्हा व सत्र न्यायाधिश बीड यांच्या हस्ते होणार असून या कार्यक्रमास जिल्हाधिकारी दिपा मूधोळ-मुंडे,जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ङ पी.एस.राजापूरकर, पदाधिकारी, केज तालुका वकील संघाचे अध्यक्ष, इत्तर सर्व शासकीय कार्यालयाचे अधिकारी, प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. या महाशिबिरात विविध शासकीय, निमशासकीय कार्यालयाचे स्टॉल्स लावण्यात येणार असून या महाशिबीराच्या माध्यमातुन सर्व शासकीय व निमशासकीय योजनांचे लाभ पात्र लाभार्थ्यांना वितरीत करण्यात येणार आहेत. कार्यक्रमास्थळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत पुरविण्यात येणा-या मोफत विधी सेवा तसेच विविध शासकीय व निमशासकीय योजनांबाबत माहिती देण्यात येणार आहे. केज तालुक्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहून महाशिबीरातील शासकीय निमशासकीय योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव जी. जी. सोनी यांनी केले आहे.

# वडवणीचे युवा उद्योजक लांडे केरळ दौऱ्यावर

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी शहारातील शेतकरी कुषी सेवा केंद्राचे मालक लांडे व पत्नी आकांक्षा लांडे यांची स्वरूप कंपनीच्या वतीने केरळ, दौऱ्यासाठी निवड झाली २०/२/२०२४ रोजी केरळ कडे रवाना झाले आहेत.२१ फेब्रुवारी रोजी लांडे यांचा वाढदिवस केरळ मध्ये साजरा केला जात आहे.व सर्व स्तरातून शुभेच्छा चा वर्षाव होत आहे. या निवडीचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, वडवणी शहरात वास्तव्यास असणारे युवा उद्योजक रवि नामदेव लांडे यांनी उच्च शिक्षण घेऊन नोकरीच्या मागे न लागता अगदी कमी वयामध्ये त्यांचे आजोबा पांडुरंग आप्पा लांडे यांच्या पासून चालत आलेली शेतकरी कुषी सेवा केंद्र लांडे योग्य रीतीने चालवत आहेत.आणि स्वरूप या कंपनीची एजन्सी चालवत आहेत. याच एजन्सीची विक्रमी खरेदी नोंद केली आहे. याच कंपनीच्या वतीने केरळ दौऱ्यासाठी निवड झाली आहे. ते काल दि.२० फेब्रुवारी २०२४ ते २६ फेब्रुवारी २०२४ या कालावधीमध्ये केरळ या पर्यटनास्थळी भेट देणार आहेत.या आधी पण त्यांनी राजस्थान, कर्नाटक, पंजाब, दिल्ली, गोवा, तमिळनाडू, मध्ये प्रदेश, तेलंगणा आशा विविध कंपनी मार्फत दौरा केलेला आहे.त्यांना सर्व व्यापारी उद्योजक व मित्र परिवार यांनी भरभरून शुभेच्छा दिल्या आहेत. या निवडीबद्दल रवि लांडे यांचे सर्वस्तरातून कौतुक केले जात आहे.

# अप्रमाणित बियाणे विरोधातील कायद्यांच्या संदर्भातील संयुक्त समितीची बैठक संपन्न



**परळी । प्रतिनिधी**

अप्रामाणित, भेसळयुक्त व बनावट बियाणे, कीटकनाशके पासून शेतकऱ्यांना संरक्षण देण्यासाठी विधिमंडळात सादर करण्यात आलेल्या प्रस्तावित कायद्याच्याबाबत विचार विनिमय करण्यासाठी नियुक्त संयुक्त समितीची तिसरी बैठक आज कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली विधिमंडळात पार पडली. या बैठकीस संयुक्त समितीचे सदस्य आ. अमोल मिटकरी, आ. डॉ. मनीषा कायंदे, आ. समीर कुणावर, आ. संजय रायमुलकर आ.कैलास पाटील, आ. बाबासाहेब पाटील, आ.दिलीप बनकर आ.प्रकाश आबिटकर, कृषी विभागाचे अप्पर मुख्य सचिव अनुप कुमार, कृषी आयुक्त सुनिल गेडाम, विधान भवन सहसचिव मेघना तळेकर व इतर अधिकारी वर्ग उपस्थित होता. या समितीच्या मागील बैठकीत झालेल्या निर्णयानुसार मागविण्यात आलेल्या हरकती व सूचनांचा विचार करण्यात आला. याद्वारे २००० अधिक हरकती व सूचना प्राप्त झाल्या असून गैरप्रकार करणाऱ्यांना कायद्याचा धाक वाटला पाहिजे, त्याचवेळी सर्वसामान्य शेतकरी आणि प्रामाणिक निवीष्ठा विक्रेत्यांना जाचक वाटायला नको याची काळजी घेतली जाईल असा पुनरुच्चार कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केला. समितीचे आजपर्यंत झालेले कामकाज विधिमंडळाच्या निदर्शनास आणणार असल्याचे सुद्धा यावेळी कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी सांगितले. बोगस व बनावट बियाण्यांना आळा घालण्यासाठी पावसाळी अधिवेशन २०२३ मध्ये कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी अत्यावश्यक वस्तू कायदा १९५५, बियाणे कायदा १९६६, कीटकनाशके कायदा १९६८ महाराष्ट्र विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम १९८१ या ४ कायद्यांमध्ये विविध सुधारणा सुचवणारी विधेयके सादर केली होती. तसेच अप्रमाणित व भेसळयुक्त निवीष्ठांपासून शेतकऱ्यांचे संरक्षण विधेयक २०२३ सुद्धा मांडले होते. विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहाने दिनांक ४ ऑगस्ट २०२३ रोजी सदरचे विधेयक दोन्ही सभागृहांच्या सदस्यांच्या २५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे पाठविण्याचा निर्णय घेतला होता.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com